# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ००४.

फोन नं. (०२०) २५६५९४६५, २५६५८१३३ फॅक्स नं. (०२०) २५६५६०४६

website : www.ebalbharati.in / www.balbharati.in


ई-मेलद्वारे

## परिपत्रक

**विषय :-** शालेय वर्ष २०२०-२१ करता मंडळाच्या पाठ्यपुस्तकांच्या छपाई-बांधणी कामाकरिता मागविण्यात येणाऱ्या ई-निविदेमध्ये करण्यात येणाऱ्या बदलांच्या माहितीबाबत...

पाठ्यपुस्तक मंडळ पाठ्यपुस्तकांच्या छपाई-बांधणी कामाकरिता प्रत्येक वर्षासाठी अखिल भारतीय स्तरावर जाहिर ई-निविदा प्रसिध्द करते. मंडळाकडे छपाई-बांधणीच्या निविदा भरणाऱ्या सर्व मुद्रणालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मंडळाच्या नियामक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शालेय वर्ष २०२०-२१ पासून प्रसिध्द करण्यात येणाऱ्या छपाई-बांधणी ई-निविदेमध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येणार असून सदर बदलांची आगाऊ माहिती आपणा सर्वांना व्हावी, या हेतूने सदर परिपत्रक पाठविण्यात येत आहे. तरी सदर परिपत्रक काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणे निविदेमध्ये करण्यात येणाऱ्या बदलाची सर्व मुद्रकांनी नोंद घ्यावी. मंडळाच्या गरजेप्रमाणे आपणाकडे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नसल्यास त्याची पूर्तता करून घेतल्यास सर्व निविदाकारांना निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल.

यासंदर्भात शालेय वर्ष २०१९-२० छपाई-बांधणी निविदेतंर्गत घेण्यात आलेल्या प्री-बीड सभेमध्ये याबाबातची सर्वकष माहिती मंडळामार्फत देण्यात आली होती.

१. मंडळाकडे निविदा भरणाऱ्या सर्व निविदाकारांकडे पुढीलप्रमाणे स्वतःची यंत्रसामुग्री असणे जरूरीचे आहे.

(अ) मजकूर छपाईसाठी
५७८ सेमी कट-ऑफचे २ रंगी किंवा बहुरंगी वेब ऑफसेट छपाई यंत्र
किंवा
२३"×३६"/२८"×४०"/तत्सम आकारातील २ रंगी किंवा बहुरंगी शीटफेड ऑफसेट छपाई यंत्र

(ब) वेब ऑफसेट या प्रकारातील छपाई यंत्र असणाऱ्या निविदाकारांकडे मुखपृष्ठ/रंगीत चित्रे (आर्ट प्लेट)/आसपास छपाईसाठी किमान १८"×२३" या आकारातील किंवा त्यापुढील कुठल्याही आकारातील २ रंगी किंवा बहुरंगी शीटफेड ऑफसेट छपाई यंत्र असणे जरूरीचे आहे.

(क) मुखपृष्ठ लॅमिनेशनसाठी लॅमिनेशन यंत्र

(ड) पुस्तकांच्या बांधणीसाठी सेंटर शिलाई यंत्र व परफेक्ट बांधणी यंत्र

२. पाठ्यपुस्तकांच्या छपाईसाठी मंडळ पीडीएफ प्रकारची फाईल सीडीद्वारे पुरवठा करते. सदर सीडीवरून छपाईसाठी आवश्यक असणाऱ्या प्लेटस् निविदाकारांनी सीटीपीद्वारे तयार करून त्याद्वारे पाठ्यपुस्तकांची छपाई करावयाची आहे. सीटीपी प्लेटस् तयार करताना योग्य सॉफ्टवेअर्स न वापरल्यामुळे पुस्तकामध्ये होणाऱ्या चुका टाळण्यासाठी सदर सीटीपी प्लेटस् तयार करण्याकरिता व इंपोझिशन करण्याकरिता आवश्यक असलेली सर्व सॉफ्टवेअर्स ही अधिकृत परवाना असलेली असणे बंधनकारक आहे. मंडळाच्या छपाईचे काम करणाऱ्या सर्व पात्र निविदाकारांना पाठ्यपुस्तकांच्या छपाईसाठी सीटीपी प्लेटस् तयार करण्याकरिता बाहेरील अन्य संस्थेची मदत घेण्याची मुभा राहील. सीटीपी प्लेटस् तयार करण्याकरिता वापरण्यात येणारी स्वतःकडील / अन्य संस्थेकडील सर्व सॉफ्टवेअर्स अधिकृत असल्याबाबतचे हमीपत्र निविदाकारास निविदेसोबत देणे जरूरीचे राहील.

३. तांत्रिकदृष्टया मंडळाकडे निविदा भरणाऱ्या सर्व निविदाकारांनी कागदापोटी दयावयाची बँक गॅरंटी ही प्रत्येक वर्षाच्या निविदेपोटी २१ महिने मुदतीची स्वतंत्र बँक गॅरंटी देणे आवश्यक राहील. तांत्रिक अडचणीमुळे मंडळाचे मागील वर्षी काम केलेल्या निविदाकारांनी त्यावर्षीच्या बँक गॅरंटीची मुदत पुढील १२ महिन्याकरता वाढवून देण्याची निविदेमध्ये समाविष्ट असलेली मुभा शालेय वर्ष २०२०-२१ पासून बंद करण्यात येणार आहे.

मंडळाने शालेय वर्ष २०२०-२१ पासून सीटीपी यंत्राद्वारे तयार होणाऱ्या प्लेटस् वगळता अन्य सर्व प्रकारच्या असोसिएट पद्धतीने (पुस्तकांच्या छपाई, बांधणी, लॅमिनेशन इत्यादींकरिता) घेण्यात येणाऱ्या सेवा बंद करण्यात येत असल्याची सर्व निविदाकारांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त आवश्यक बाबींची पूर्तता आपण निविदा प्रसिध्द होण्यापूर्वीच केल्यास आपणापुढील संभाव्य अडचणी दूर होतील. तरी त्या दृष्टीने सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

**( डॉ. सुनिल मगर )**
**संचालक**
पाठ्यपुस्तक मंडळ,
'बालभारती', पुणे - ४

**क्रमांक** : म-१/ 515
**दिनांक** : १५.०४.२०१९

प्रति,

**सर्व निविदाकार**

D : Mahendra/2019/April 2019/Letter/ 13